SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004 MAHARASHTRA
PHONE: EPBX - 2609000 FAX:0091-0231-2691533 & 0091-0231-692333
DLL 02312609091,2609135 Website : www.unishivaji.ac.in E-mail :affiliation.t2@unishivaji.ac.in
Website Conduit : (1) Affiliation→Affiliation T2 Circulars(2) Affiliation →Affiliation T2 Information Lists
Estd : 1962
NAAC 'A++' Grade
Accerediteted by NAAAC (2021)
With CGPA3.52
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४ महाराष्ट्र
दूरध्वनी ईपीबीएक्स- २६०९०००, फॅक्स ००९१०२३१२६९१५३३ व ००९१०२३१६९२३३३
संलग्नता टी २ विभाग थेट दूरध्वनी क्र. ०२३१ २६०९०९१,२६०९१३५

जा.क्र. संलग्नता/टी-२/परिपत्रक/No 778 दि. 26 JUL 2023

# परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नीत महाविद्यालये,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**विषय:-** उच्च व तंत्र विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती या योजनेअंतर्गत सन २०२३-२४ करिता शिष्यवृत्ती निवडीसाठी अर्ज स्विकृतीच्या मुदतवाढीबाबत...

**संदर्भ:-** मा. विभागीय सहसंचालक, (उच्च शिक्षण), कोल्हापूर यांचे
जा.क्र. विसस/उशि/कोवि/शिष्यवृत्ती/२०२३/२४८३, दि.१३/०७/२०२३ रोजीचे पत्र

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय संदर्भांकित पत्रास अनुसरून **सन २०२३-२४ करिता खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" योजनेअंतर्गत** शिष्यवृत्ती निवडीसाठी **ऑनलाईन अर्ज स्विकृती करिता** व **पडताळणीकरिता मुदतवाढ** देण्यात आली आहे.

तरी सोबत जोडलेले संदर्भांकित पत्र अवलोकनी घेवून **विहित कालमर्यादेत** विद्यापीठ संलग्नीत सर्व महाविद्यालयांनी आवश्यक ती कार्यवाही आपल्या स्तरावरून त्वरीत करावी.

आदेशान्वये

श्री.विलास एस. सोयम
उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

**सोबत-** वरीलप्रमाणे.

# महाराष्ट्र शासन


## विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

राजाराम महाविद्यालय परिसर, विद्यानगर, कोल्हापूर -४१६ ००४

E-mail: jdhekop@gmail.com

फोन क्र. : (०२३१) २५३५४००, २५३५४५४ फॅक्स : (०२३१) २५३५४००


जा.क्र. : विसस/उशि/कोवि/शिष्यवृत्ती/२०२३/ 2483 दिनांक :- १३.०७.२०२३

**-: अत्यंत महत्वाचे परिपत्रक :-**

प्रति,

१. कुलसचिव,
शिवाजी विदयापीठ,कोल्हापूर

२. प्राचार्य,
शासकीय,अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित,कायम विनाअनुदानित
कला, वाणिज्य,विज्ञान,विधी व शिक्षणशास्त्र महाविदयालये,कोल्हापूर विभाग कोल्हापूर


Date - 24.जुलै.2023
Inward No. 957
PRO CN.B.D / Addl


विषय :- **उच्च व तंत्र विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षाणासाठी शिष्यवृत्ती या योजनेअतर्गत सन २०२३-२४ करिता शिष्यवृत्ती निवडीसाठी अर्ज स्विकृतीच्या मुदत वाढीबाबत...**

संदर्भ :-

1. **शासन पत्र उच्च व तंत्र शिक्षण विभाग कंमाक पशियो-२०२३/प्र कं५०/तांशि-४, दि.२९.५.२०२३**
2. **संचालनालयाचे पत्र क.१७/तंशिसं/परदेशी शिष्यवृत्ती/२०२३/१५१,१५२ व १५३, दि.१२ जुन २०२३**
3. **शासन पत्र तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट राज्य कमांक १७/तंशिसं/परदेशी शिष्यवृत्ती /२०२३/ १७९, दि. १२ जूलै २०२३.**


SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR
17 JUL 2023
INWARD SECTION
Inward No 754.


उपरोक्त संदर्भाधिन पत्रानुसार सूचित करण्यात येते की,शासन निर्णय दि.04 ऑक्टोबर,२०१८ अन्वये उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षाणासाठी शिष्यवृत्ती योजना जाहीर करण्यात आलेली असून संदर्भाधिन कं १ च्या दिनांक २९ मे, २०२३ रोजीच्या शासन पत्रान्वये सदरची योजना शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये राबविण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.

त्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता जाहिरात दिनांक १२ जून,२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. याबाबत आपणांस संदर्भाधिन क. २ च्या दिनांक १२ जून,२०२३ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे की, सदर शिष्यवृत्तीसाठी online पध्दतीने अर्ज करावयाचे असून, उमेदवारांनी अर्ज करण्याची मुदत दि.१२ जूलै,२०२३, सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत होती. तसेच online भरलेल्या अर्जाची प्रत व आवश्यक प्रमाणपत्रे व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती या कार्यालयास मूळ कागदपत्रावरुन पडताळणी करुन सादर करण्याची मुदत दि.१३ जुलै २०२३, सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत होती.तथापि,उक्त संदर्भाधिन क.३ च्या दिनांक १२ जूलै,२०२३ च्या पत्रान्वये शासनाने खुल्या प्रवर्गातील गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्तीसाठी अर्ज स्वीकृत मुदत वाढवून आता, उमेदवारांनी online पध्दतीने अर्ज करण्याची मुदत दिनांक **१२ जूलै,२०२३ वरुन दिनांक १३ ऑगस्ट,२०२३** अशी करण्यात आलेली आहे, याची नोंद घेण्यात यावी.


P. G. Adm Section
Inward No.:-
Inward Date :- 17/07/23
Supdt. Asstt. Registrar Deputy Registrar Registrar


**(डॉ.अशोक उबाळे)**
**विभागीय सहसंचालक,**
**उच्च शिक्षण,**
**कोल्हापूर विभाग,कोल्हापूर.**

**सोबत :- सन २०२३-२४ करिता शिष्यवृत्ती निवडीसाठी अर्ज स्वीकृतीचा सुधारित कार्यक्रम**

**प्रत :- मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), मध्यवर्ती इमारत, पुणे -१**

## उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" या योजनेंतर्गत सन २०२३-२४ करिता शिष्यवृत्ती निवडीसाठी अर्ज स्विकृतीचा सुधारित कार्यक्रम

| अ.क्र. | कार्यक्रम | कालावधी |
|---|---|---|
| १ | संकेतस्थळावर online पद्धतीने अर्ज भरणे व आवश्यक प्रमाणपत्रे व कागदपत्रे अर्जासोबत अपलोड करणे | दि. १२ जून, २०२३ ते दि. १३ ऑगस्ट, २०२३ |
| २ | • ज्या उमेदवारांनी कला, वाणिज्य, विज्ञान व विधी शाखेंतर्गत येणाऱ्या अभ्यासक्रमासाठी अर्ज केला आहे त्यांनी उमेदवार वास्तव्यास असलेल्या जिल्ह्याशी संबंधित सहसंचालक, विभागीय कार्यालय, उच्च शिक्षण येथे<br>व<br>• ज्या उमेदवारांनी व्यवस्थापन, अभियांत्रिकी / वास्तुकलाशास्त्र व औषधनिर्माणशास्त्र शाखेंतर्गत येणाऱ्या अभ्यासक्रमासाठी अर्ज केला आहे त्यांनी उमेदवार वास्तव्यास असलेल्या जिल्ह्याशी संबंधित सहसंचालक, विभागीय कार्यालय, तंत्र शिक्षण येथे<br>वर नमूद केल्याप्रमाणे online भरलेल्या अर्जाची प्रत, मूळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे त्यांच्या साक्षांकित प्रतींसह पडताळणीसाठी सादर करावीत. | दि. १३ जून, २०२३ ते दि. १४ ऑगस्ट, २०२३ (सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत) |